ARIS CELL
URGENT

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला –४४४१०४
## निम्न कृषि शिक्षण

**प्रा. डि. बी. तामगाडगे**
**सहयोगी अधिष्ठाता**

**फोन नं. ०७२४ २२५८७०६**

---

क्र.सअ/निकृशि/मु.वा.प्रवेश/६३२/२०१६
निम्न कृषि शिक्षण, डॉ. पंदेकृवि, अकोला,
दिनांक : २२/०८/२०१६

प्रति.

प्राचार्य
घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालय (सर्व),
प्राचार्य
खाजगी कायम विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतन (सर्व),
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला कार्यक्षेत्र

**द्वारा** :– विद्यापीठाचे संकेतस्थळ **www.pdkv.ac.in**

**विषय** :– सन २०१६–२०१७ या शैक्षणिक वर्षाची कृषि तंत्र विद्यालय/निकेतन पदविका प्रवेशाची वाढीव स्पॉट प्रवेश फेरी राबविण्याबाबत.

**संदर्भ** :– पत्र जा.क्र.:मकृप/शिक्षण–१/२६१६/२०९९ दिनांक २०.०८.२०१६

वरील संदर्भांकित प्रवेश सुचनेनुसार स्थळ प्रवेश (Spot admission) प्रक्रिया दि. १४.०८.२०१६ रोजी संपलेली आहे. परंतु सद्याच्या प्राप्त अहवालानुसार फक्त ५४% जागा भरलेल्या आहेत व सद्यस्थितीत बऱ्याच ठिकाणी रिक्त जागा राहल्या आहेत.

यापूढील प्रवेश फेरी दि. २४.०८.२०१६ रोजी पर्यत प्रवेश सोडून गेलेल्या किंवा रिक्त राहिलेल्या जागेकरिता केटीपीएलची अंतिम गुणवत्ता यादी (दि. २६.०७.२०१६ रोजी प्रसिध्द झालेली) वापरायची आहे. परंतु यादीमध्ये उमेदवारांची संख्या नगण्य असल्यामुळे ज्या उमेदवाराने केटीपीएलकडे अर्ज भरलेलाच नाही आणि प्रवेश घेवू इच्छितात अश्या उमेदवारांसाठी वाढीव स्पॉट ॲडमिशन फेरी जागा शिल्लक असल्यास (जेथे प्रवेश घ्यायचा असेल त्या विद्यालयात/निकेतनात) कृषि तंत्र विद्यालयात/विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतनात सोबत जोडलेल्या प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत स्वत: राबवावी यामध्ये जिल्ह्याचे बंधंन राहणार नाही. परंतु उमेदवार हा विदर्भातील असावा.

उमेदवाराने प्रवेशासंबंधीचा प्रवेश अर्ज (**www.mcaer.org या संकेतस्थळावर उपलब्ध** दि. २४.०८.२०१६ पासुन) संबंधीत कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनातुन दि. २४.०८.२०१६ ते २७.०८.२०१६ या कालावधीत प्राप्त करावे. तसेच प्रवेश अर्ज संबंधीत कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनाने आपले स्तरावर खुल्या संवर्गासाठी रू. ४००/– व मागास संवर्गासाठी रू २००/– आकारून दि. २४.०८.२०१६ ते २८.०८.२०१६ या कालावधीत भरून घ्यावा.

APES CELL
URGENT

त्यानंतर दि. २८.०८.२०१६ रोजी प्राप्त अर्जांची छाननी व गुणवत्ता यादी तयार करावी. दि. २९.०८.२०१६ रोजी आपआपल्या कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनात गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन आपआपल्या जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविणारे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य यांचेकडून सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून दि. ३०.०८.२०१६ ते ३१.०८.२०१६ या कालावधीत तपासुन दि. ०३.०९.२०१६ ते ०४.०९.२०१६ या कालावधीत गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घ्यावी.

विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार आपआपल्या कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनात प्रवेश प्रक्रिया दि. ०६.०९.२०१६ रोजी कार्यालयीन वेळेत स्वत: राबवावी. प्रवेश प्रक्रिये दरम्यान विद्यार्थी स्वत: हजर राहणे अनिवार्य आहे.

यानंतर प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्याकडून तपासून प्रमाणित करण्यात आलेल्या याद्या आणि वर जमा झालेल्या रकमेचा (वरील प्रती अर्जदार खुला संवर्ग रू. ४००/— व मागास संवर्ग रू. २००/— प्रमाणे) धनादेश एकत्रितरित्या **सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** यांचे नावे त्यांचे कार्यालयात सादर करावे.

सहयोगी अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.

प्रतिलीपी :—

१. मा. कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. अधिष्ठाता (कृषि ) डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहितीकरीता सविनय सादर.
३. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता सविनय सादर.
४. उपकुलसचिव (वि.वि.), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता अग्रेषित.
५. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सदर पत्र व प्रवेश प्रणाली वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

**सुचना :— कृषि तंत्र विद्यालय/कृषि तंत्र निकेतनाच्या रिक्त जागा भरण्याबाबतच्या परिपत्रकास सूचना फलकावर प्रसिध्दी द्यावी व आपल्या स्तरावर स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## निम्न कृषि शिक्षण

रिक्त जागा भरणे प्रवेश प्रणाली वेळापत्रक २०१६–१७

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेत स्थळावर अर्जाची उपलब्धता | २४.०८.२०१६ |
| २. | संपूर्ण भरलेले अर्ज संबंधित विद्यालय सादर करण्याचा अंतिम दिनांक | २७.०८.२०१६ |
| ३. | संबंधित विद्यालयस्तरावर अर्जाची छाननी करणे | २८.०८.२०१६ |
| ४. | संबंधित विद्यालयस्तरावर गुणवत्ता यादीची प्रसिध्दी | २९.०८.२०१६ |
| ५. | कृषि तंत्र विद्यालय / निकेतनांनी विद्यार्थी गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे त्या त्या जिल्हयातील घटक / संलग्न विद्यालयांच्या प्राचार्याकडून तपासून घेणे | ३०.०८.२०१६ ते ३१.०८.२०१६ |
| ६. | गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घेणे | ०३.०९.२०१६ ते ०४.०९.२०१६ |
| ७. | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार विद्यार्थ्यांनी कृषि तंत्र विद्यालय / निकेतन येथे प्रवेश घेऊन हजर होण्याचा दिनांक | ०६.०९.२०१६ |

**कुलसचिव**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.